




दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग

घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष

विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.

संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २०० वा | शनिवार, दि. १४ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्यासाठी विरोधकांनी संसदेत दाखल केली नोटीस

## २०० हून अधिक खासदारांच्या स्वाक्षऱ्या

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** भारतीय लोकशाहीच्या इतिहासात पहिल्यांदाच एका मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरुन हटवण्यासाठी विरोधी पक्षांनी आक्रमक पवित्रा घेतला असून संसदेच्या दोन्ही सभागृहात महाभियोगाची नोटीस सोपवण्यात आली.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात ही नोटीस बजावण्यात आली असून त्यावर तब्बल 193 खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. यामध्ये लोकसभेतील 130 आणि राज्यसभेतील 63 खासदारांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, महाभियोगाची प्रक्रिया सुरु करण्यासाठी लोकसभेत किमान 100 आणि राज्यसभेत किमान 50 खासदारांचे समर्थन आवश्यक असते. विरोधकांनी हा आकडा सहज पार केला असून आता या मुद्द्यावरुन संसदेत मोठा संघर्ष होण्याची चिन्हे आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेचे नेतृत्व तृणमूल काँग्रेसने केले असून त्यांना काँग्रेस, समाजवादी पक्ष, डीएमके, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आणि 'इंडिया' आघाडीतील इतर महत्त्वाच्या पक्षांनी खंबीर पाठिंबा दिला. तृणमूल काँग्रेसने दहा पानांच्या विस्तृत नोटीसमध्ये ज्ञानेश कुमार यांच्यावर भ्रष्टाचाराचे आणि कर्तव्यात कसूर केल्याचे सात गंभीर आरोप ठेवले.

तांत्रिक कारणास्तव ही नोटीस फेटाळली जाऊ नये, यासाठी विरोधकांनी दोन स्वतंत्र संच तयार केले आहेत. लोकसभेसाठी 130 खासदारांचा एक संच आणि राज्यसभेसाठी 63 खासदारांचा दुसरा संच तयार करण्यात आला असून शनिवारी (14 मार्च) ही अधिकृत नोटीस दोन्ही सभागृहांच्या पीठासीन अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली जाणार आहे. सध्या संसदेचे सचिवालय या नोटिशीची कायदेशीर पडताळणी करत आहे.




महाभियोगाची ही प्रक्रिया अत्यंत जटिल असून ती सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना हटवण्याच्या प्रक्रियेसारखीच असते. केवळ सिद्ध झालेले गैरवर्तन किंवा अक्षमता याच आधारावर अशा प्रकारचा प्रस्ताव मांडला जाऊ शकतो. हा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहात विशेष बहुमताची गरज असते, म्हणजेच सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येचे बहुमत आणि उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन-तृतीयांश सदस्यांचे समर्थन आवश्यक असते. विरोधकांनी उचललेले हे पाऊल निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर आणि कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे असून यामुळे येणाऱ्या दिवसांत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार वाकयुद्ध रंगण्याची शक्यता आहे.

# पंढरपूर येथे १४ व १५ मार्च रोजी दोन दिवसीय जिल्हास्तरीय ग्रंथालय अधिवेशन

## पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे – जिल्हा ग्रंथालय अधिकारी हुसे यांचे आवाहन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील शासनमान्य ग्रंथालयांच्या बळकटीकरणासाठी पंढरपूर येथे १४ व १५ मार्च रोजी दोन दिवसीय जिल्हास्तरीय ग्रंथालय अधिवेशन व ग्रंथमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या अधिवेशनास जिल्ह्यातील सर्व शासनमान्य ग्रंथालयांचे पदाधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री. हुसे यांनी केले.

या अधिवेशनाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन गुगल मीट बैठकीत त्यांनी सर्व तालुक्यांतील ग्रंथालय प्रतिनिधींना मार्गदर्शन करताना ही माहिती दिली. बैठकीच्या सुरुवातीला श्री. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक करून अधिवेशनाच्या आयोजनामागील उद्दिष्टे व कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली.

यानंतर ग्रंथालय निरीक्षक श्री. संजय ढेरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ग्रंथालय चळवळीच्या बळकटीकरणासाठी अशा अधिवेशनांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच जिल्ह्यातील सर्व शासनमान्य ग्रंथालयांनी सक्रिय सहभाग घेतल्यास ग्रंथालय चळवळीला अधिक चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत पुढे सांगण्यात आले की, प्रत्येक तालुक्यातील शासनमान्य ग्रंथालयांचे पदाधिकारी व कर्मचारी यांनी आपली उपस्थिती संबंधित तालुक्यातील जबाबदार प्रतिनिधींकडे नोंदवावी. नियोजनबद्ध पद्धतीने सर्वांनी सहभागी झाल्यास अधिवेशन यशस्वी होण्यास मदत होईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, पंढरपूर येथे होणाऱ्या या दोन दिवसीय अधिवेशनामध्ये ग्रंथालय क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा, मार्गदर्शन सत्रे तसेच वाचन संस्कृतीला चालना देणारे उपक्रम आयोजित करण्यात येणार असून जिल्ह्यातील ग्रंथालय पदाधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये या अधिवेशनाबाबत उत्साहाचे वातावरण आहे.




# अखिल गुरव समाज संघटनेचे 17 मार्चला मुंबईत आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अखिल गुरव समाज संघटनेच्या वतीने गुरव समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी येत्या १७ मार्च रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस डॉ. रंगनाथ गुरव यांनी पत्रकार परिषदेत दिली. शासनाने वारंवार मागण्या करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे तिसऱ्यांदा आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गुरव समाजाच्या विविध प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी यापूर्वी दोन वेळा आंदोलन करण्यात आले होते. मात्र त्याची अपेक्षित दखल घेतली गेली नसल्याने आता मोठ्या प्रमाणात राज्यभरातील गुरव समाज मुंबईत एकत्र येऊन धरणे आंदोलन करणार आहे. समाजाच्या हक्कांबाबत न्याय मिळावा, तसेच देवस्थानांशी संबंधित अनेक प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.




संघटनेच्या वतीने शासनाकडे अनेक महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये देवस्थान इनाम वर्ग ३ चे वतन खालसा करणे, देवस्थान जमिनींचा फेरसर्व्हे करणे, बेकायदेशीर हस्तांतरण झालेल्या जमिनी मूळ सनदधारकांच्या ताब्यात देणे यांसारख्या मागण्यांचा समावेश आहे. तसेच इतर हक्कांतील नाव काढून गुरवांच्या नावे कब्जेदार सदरी लावणे, देवस्थान जमिनींवर लावलेले बेकायदेशीर कुळ काढून टाकणे आणि सार्वजनिक कामांसाठी घेतलेल्या जमिनींसाठी शासनाने चालू बाजारभावाप्रमाणे योग्य मोबदला द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय वारसनोंद प्रक्रिया सुरू करणे, सर्व देवस्थान ट्रस्टमध्ये गुरव (पुजारी) समाजाला किमान ५० टक्के विश्वस्त पदाधिकारी म्हणून स्थान देणे, तसेच गुरव समाजाचा देवस्थान पूजा, धार्मिक विधी व उत्पन्नावरील वंशपरंपरागत हक्क कायम ठेवण्याची मागणी संघटनेने केली आहे. मंदिरांचे अधिग्रहण करण्याचा कायदा करू नये, शासनाने मंदिरे ताब्यात घेण्याऐवजी त्यांचा विकास करून ती स्वयंपूर्ण करावीत आणि मंदिरांचे पावित्र्य टिकवण्यासाठी राजकीय अतिक्रमण थांबवावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

गुरव समाजातील अनेक पुजारी आयुष्यभर देवपूजा करूनही वृद्धापकाळात आर्थिक अडचणींना सामोरे जात असल्याचे सांगून ६० वर्षांपेक्षा जास्त वय झालेल्या पुजाऱ्यांना निवृत्ती वेतन द्यावे, तसेच सर्व पुजाऱ्यांना किमान दरमहा पाच हजार रुपये मानधन देण्याची मागणीही करण्यात आली आहे. सर्व मंदिरे पुजारी व सेवक यांच्या व्यवस्थापनाखाली चालवावीत, तसेच सन १९५० च्या सार्वजनिक विश्वस्त कायद्यातील ३६ वे कलम दुरुस्त करावे, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

याचबरोबर गुरव समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांकडेही संघटनेने लक्ष वेधले आहे. शेतीविषयक कर्जपुरवठा सवलती उपलब्ध करून द्याव्यात, ओबीसी निधी वाटप जातनिहाय करावे, ओबीसीसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करून विकास निधी वाढवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागात गुरव समाजाची घरे कमी असल्यामुळे शेती व उत्पन्नाच्या वादातून त्यांच्यावर हल्ल्यांचे प्रमाण वाढत असल्याचे सांगून अशा घटनांवर अ‍ॅट्रॉसिटी कायद्याच्या धर्तीवर कडक कायदा करावा, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

या सर्व मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या पत्रकार परिषदेला किशोर पाटील, आदिनाथ पुजारी, गणेश पुजारी, शिवदास कदम आदी उपस्थित होते.

# सोलापूर महानगरपालिकेचे सन २०२६-२७ चे प्रशासकीय अंदाजपत्रक सादर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे आज सोलापूर महानगरपालिकेचे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे प्रशासकीय अंदाजपत्रक आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते व महापौर विनायक कोंड्याल यांच्याकडे सादर केले.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचे प्रशासकीय अंदाजपत्रक तयार केले आहे. शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, मूलभूत नागरी सुविधा अधिक सक्षम करणे, पायाभूत



सुविधा बळकट करणे तसेच नागरिकांच्या अपेक्षा व गरजा लक्षात घेऊन विविध विकासकामांसाठी या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली आहे.

शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते विकास, आरोग्य सेवा तसेच इतर नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अंदाजपत्रकामध्ये विविध विभागांसाठी करण्यात आलेल्या तरतुदींबाबत सविस्तर माहिती दिली.

या प्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेविका तथा अध्यक्ष रोहिणी तडवळकर, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखा परीक्षक सदानंद वाघमोडे (पान 2 वर..)


सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!

श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे

वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.

1299/- प्रति स्क्वे. फूट

मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.

9763764949

कृषी विषयक

मिरची, सिमला मिरची, पपई, वांगी, कलिंगड, खरबूज, काकडी पिकांवरील थ्रिप्स, पांढरी माशी, कोळी, व्हायरस, चुरडा-मुरडा नियंत्रणासाठी, जलद वाढ, फुटव्यासाठी, पिकांची रोगप्रतिकारक, किड प्रतिबंधक शक्ती, उष्णतेचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी एकमात्र अनुभवसिध्द औषधी 'प्रतिकार', 'प्रहार', 'प्रतिबंध' महाराष्ट्रात कोठेही पाठवले जाईल.

संपर्क :

कुदरत ॲग्रो ऑरगॅनिक्स

9970115450

3000 Sq.ft. प्लॉट N.A. देणे आहे

शिनगारे सिटी सांगोला वासुद रोड, अल्टिमेट जिम च्या पूर्वेस

संपर्क :

डी. बी. शिंदे

9579421465



## संपादकीय

# उच्च शिक्षणातील बदलते वास्तव

उच्च शिक्षणाच्या वाढत्या संधी, स्वायत्ततेचे प्रयोग आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यामुळे शिक्षण व्यवस्थेत नवे बदल घडत आहेत; मात्र शिक्षक भरतीतील अडथळे, विद्यार्थ्यांची घटती उपस्थिती आणि प्रशासकीय गुंतागुंत अशा अनेक आव्हानांनाही ही व्यवस्था सामोरी जात आहे. भारत हा महासत्ता बनू पाहताना या शिक्षण व्यवस्थेत असलेली बलस्थाने आणि दुर्बलस्थाने पाहावी लागतील. शाश्वत बदलांसाठी सकारात्मक आणि रचनात्मक वाटचाल शिक्षण व्यवस्थेत व्हायला हवी. या व्यवस्थेतील बलस्थानाचे महत्त्व ओळखून दुर्बल स्थानांवर मात करणारी यंत्रणा गरजेची आहे. नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, केंद्र व राज्य शासनाच्या विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणलेल्या योजना आणि त्यामागील उद्देशदेखील सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक वाटते. महाराष्ट्रात 1 केंद्रीय विद्यापीठ, 23 राज्य विद्यापीठे, 21 अभिमत विद्यापीठे आहेत. ऑल इंडिया सर्व्हे ऑफ हायर एज्युकेशन आणि यूजीसीकडील उपलब्ध माहितीनुसार 2019-20 मध्ये राज्यामध्ये मान्यताप्राप्त सर्व महाविद्यालयांची संख्या 4,468 होती. महाविद्यालयांमधून स्वावलंबी, कौशल्याधिष्ठित आणि रोजगाराभिमुख शिक्षणाची व्यवस्था व्हावी, ही सर्वांचीच अपेक्षा! राज्यातील मोजकी संलग्नित तसेच प्रामुख्याने स्वायत्त महाविद्यालये (सायबर इन्स्टिट्यूट, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड आदी) स्वावलंबी आणि व्यवसाय-रोजगाराभिमुख शिक्षणक्रम प्रभावी अन् यशस्वीरीत्या राबवत आहेत. सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजला इम्पॉवर्ड ऑटोनॉमस म्हणजेच अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालय दर्जा आहे. कारण, विद्यार्थ्यांची मागणी, स्थानिक गरजा, बदलती सामाजिक आणि व्यावसायिक परिस्थिती विचारात घेऊन तत्काळ नवनवे अभ्यासक्रम, परीक्षा, त्यांचे निकाल आणि पदवी हे सर्व महाविद्यालय स्तरावर तत्काळ आणि प्रभावीपणे होऊ लागते. त्यामुळे दिरंगाई टाळून विद्यार्थ्यांना करिक्युलर आणि को-करिक्युलर ॲक्टिव्हिटीजमध्येदेखील मिळणाऱ्या संधी रुंदावतात. मोठ्या वृक्षाखाली लहान वृक्ष विस्तारू शकत नाही, असे म्हटले जाते. त्यानुसार दीडशे-दोनशे संलग्नित महाविद्यालय असलेल्या विद्यापीठापेक्षा स्वायत्त महाविद्यालय आणि स्वायत्त विद्यापीठामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षण आणि तत्सम संधीदेखील वाढतात. कर्मवीर भाऊराव पाटील सातारा विद्यापीठाचा ओजस देवतळे हा विद्यार्थी तिरंदाजी स्पर्धेमध्ये अर्जुन पुरस्कार मिळवतो. तो राज्य, राष्ट्रीय ते जागतिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदकापर्यंत झेप घेतो. हा विकेंद्रीकरणाचाच लाभ! दुसरीकडे अशा स्वायत्त आणि समूह विद्यापीठ धोरणानुसार शासनाला अनुदानित व्यवस्था आणि तशी पदे बंद करावयाची आहेत, असा नकारात्मक प्रवाह विनाकारण चर्चेला येतो; परंतु अशा ठिकाणी सर्व अनुदानित जागांना संरक्षण देण्याचे लेखी हमीपत्र राज्य शासन देते. मग, हे धोरण नकारात्मकतेकडे का न्यावे? उलट अशा ठिकाणी दिरंगाई टाळून पारदर्शकता आणि सातत्याने गुणवत्तेचा आग्रह धरला, तर स्वायत्ततेच्या संधीचे रूपांतर सोन्यात होऊ शकते. अर्थात, या यशस्वी संकल्पनेची तंतोतंत तशी अंमलबजावणी सरसकट महाविद्यालयांतून करता येण्याबद्दल मतभिन्नता असेल. उच्च शिक्षण व्यवस्थेत गुणात्मक आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवताना या व्यवस्थेतील अंतरंगदेखील पाहायला हवेत. महाविद्यालयांमधून कोणत्याही जागा भरायच्या म्हटल्या, तर पदमान्यता, बिंदू नामावली, विद्यापीठ मान्यता, उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालय, शिक्षण संचालक कार्यालय ते मंत्रालय, मध्येच शासनाचे बदललेले नियम, निकष, नव्याने येणारे आरक्षण नियम, त्याचा बिंदू नामावलीवरील परिणाम असे अग्निदिव्य अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे दिसते. इकडे एका विषयासाठी शेकडोच्या संख्येने पात्र असलेले नेट-सेट उत्तीर्ण उमेदवार, जोडीला पीएच.डी. प्राप्त उमेदवार आणि अध्यापन अनुभव रिसर्च पेपर यासह कितीही उत्तम उमेदवार असला, तरी नेमणुकीवेळी वेगळा कथित महागडा हिडन क्रायटेरिया (?) पुढे येतो त्याचं काय? आधीच बहुतांश महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांच्या घटत्या हजेरीचा गंभीर प्रश्न पुढे येत आहे. पायाभूत सुविधा, शिक्षकांचे अध्यापन, विद्यार्थ्यांचे वैयक्तिक प्रश्न जसे की, आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, तात्पुरती नोकरी, शेती, शिक्षण, अभ्यास याबद्दल उदासीनता, छोटासा व्यवसाय, नोकऱ्याच नसल्याने शिकून करायचे काय (आधीची वर्षानुवर्षे साचलेली बेरोजगारी) अशी अनेकविध कारणेदेखील यापुढे उच्च शिक्षणातील समस्या म्हणून केंद्रस्थानी राहतील. त्यातच आता होऊ घातलेली विद्यार्थ्यांच्या बायोमेट्रिक हजेरीची सक्ती! वर्षानुवर्षे तासिका तत्त्वावर असलेल्या प्राध्यापकांसमोर नोकरीची असुरक्षितता, तुटपुंजे मानधन, वेतनात विलंब, सामाजिक सुरक्षा लाभांचा अभाव, कामाचा अतिरिक्त ताण, सेवाज्येष्ठतेचा कमी विचार, भरती प्रक्रियेतील अनिश्चितता असा चक्रव्यूह दिसत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनइपी) 2020 नुसार महाविद्यालयांमधून सर्वच शाखांमध्ये पर्यायी मेजर, मायनर आणि तत्सम अनेक विषयांची लांबलचक यादी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने आली आहे. त्यामुळे त्यातील काही विषयांना विद्यार्थी अत्यल्प, तर काही विषयांना विद्यार्थी संख्या वाढली आहे. कार्यभार वाढला, तरी त्यानुसार पदे मंजूर होणे, तासिका तत्त्वावर वाढलेल्या कार्यभाराप्रमाणे वाढीव पदांना वेतन मंजुरीची हमी दिसत नाही. कॉलेजकडे येणाऱ्या बहुतांश पत्रांमध्ये तत्काळ, अतितत्काळ, महत्त्वाचे, अतिशय महत्त्वाचे आणि संबंधित कार्यवाही न झाल्यास कॉलेज, प्राचार्य जबाबदार राहतील, असे वारंवार येणारे सक्त लेखी आदेशसुद्धा या शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनला आहे. अध्यापनाशिवाय इतर कामकाजाकरिता आवश्यक असणारा शिक्षकेतर कर्मचारीवर्ग, ग्रंथपाल तसेच शारीरिक शिक्षण संचालक यांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. या साऱ्या पार्श्वभूमीवर, जुनी-गंजलेली शस्त्रे अन् तुटपुंजे सैन्य बळ घेऊन सर्वार्थाने बलाढ्य असलेल्या शत्रूविरुद्धचे युद्ध जिंकण्यासारखे आव्हान या उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर दिसत आहे. अर्थात, अशा स्वरूपाचे बहुआयामी बनलेले अन् अडथळ्यांच्या शर्यतीचे स्वरूप फक्त उच्च शिक्षणात नाही, तर प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर देखील हे सारे चक्र आहेच. असे असले, तरी निगेटिव्ह प्रूव्ह करण्यापेक्षा स्वतः इम्प्रुव्ह होणं तितकंच गरजेचं! दृढ संकल्प ठेवून पुढील विकासात्मक, शाश्वत वाटचाल मात्र करावीच लागेल.

पान १ वरून

## सोलापूर महानगरपालिकेचे...

तसेच स्थायी समिती सदस्य संगीता जाधव, अश्विनी चव्हाण, भरतसिंग बडरूवाले, बिजू प्रधाने, सतीश सिरसील्ला व सत्यनारायण गुर्रम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांनी सांगितले की, महापालिका आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने सोलापूर शहरातील नागरिकांच्या सूचना तसेच स्थायी समिती सदस्यांच्या बैठकीनंतर आवश्यक त्या सुधारणा करून सुधारित अंदाजपत्रक जाहीर करण्यात येईल.

# माणसं बिथरली, नितीमत्ता घसरली!

तो एक विलक्षण असा काळ होता, आमच्या लहानपणीचा. सगळी माणसं कशी नेक होती. प्रामाणिक होती, चारित्र्यवान आणि नितीवान होती.म्हणून आमच्या लहानपणी जिकडे तिकडे आनंदी वातावरण होते.लोक एकमेकांशी माणुसकीने, आपुलकीने वागत.प्रेमाने,स्नेहाने, स्वच्छ भावनेने व आदराने बोलत. आमच्या लहानपणी आजच्या सारखी विकोपाला जाणारी भांडणे होत नव्हती.वादविवाद नव्हते, मारामारी नव्हती आणि माणसांच्या मनात आजच्या सारखा वितुष्टपणा व ढोंगीपणा नव्हता.जे होतं ते सगळं मन मोकळं, दिलखुलास होतं व स्वच्छ स्वभावाची रेलचेल होती. नितीमत्ता सोडून कोणीही वाईट वागत नव्हते,एकमेकांना कमी लेखत नव्हते.आता मात्र माणसांनी कमाल केली आहे.प्रत्येकजण मनात आलं तसं जीवन जगत आहे,नितीमत्ता सोडून वाईट वागत आहे.नितीमत्ता घसरली आहे, माणसं बिथरली आहेत आणि माणुसकीला लाथाडून बेगडी व ढोंगी झाले आहेत.

आम्ही जेव्हा लहान होतो तेव्हा आजच्या एवढ्या सुबत्ता नव्हती. घरं लहान लहान होती,पण त्या लहानशा घरात राहणाऱ्या माणसांची मने मात्र फार मोठी होती.घराघरांत गरीबी होती पण स्वाथार्ची लाचारी नव्हती.हाताला रोजगार मिळायचा,मायबाप तो रोजगार आवडीने करायचे,दिवस रात्र कष्ट करायचे.रोजगाराच्या पैशाने मोठ्या कुटुंबाचं पालन पोषण करायचे.फार मोठ्या हिमतीने व कष्टाने लेकरांना शिक्षण शिकवायचे.एक किंवा दोन कपडे घालायला मिळायचे,कापडाच्या किंवा पोत्याच्या पिशवीचे दप्तर असायचे.पायाला चप्पल नसायची. अनवाणी पायाने चालण्याची मजा वेगळीच होती.शिक्षणात रस होता, शिकण्याची गोडी होती,जीवनात आनंद होता.एकत्र कुटुंबाचा फार मोठा आधार होता.गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या धाकात राहायचो, उलट शब्द बोलण्याची हिंमत नव्हती.एकमेकांचे सुखदुःख वाटून घेतले जायचे, चांगले संस्कार रूजवले जायचे.व्यसनी माणसे कोठेही दिसत नसत.सगळे गावकरी मिळून सण उत्सव साजरे करायचे.सणाच्या दिवशी गुळाची पोळी गुळाच्या गुळवणी पाण्यात कुस्करून खाताना एक वेगळाच आनंद मिळायचा.भात आमटीचा स्वाद मन भरून टाकायचा.असे हे आमचे साधे जीवन होते पण सुख मात्र आकाशाएवढे होते. विविध प्रकारचे मैदानी खेळ खेळून आम्ही दमायचो,थकायचो. कडाडून भूक लागायची.आईने केलेला स्वयंपाक, कोणतीही भाजी स्वादिष्ट व रूचकर लागायची. शिक्षणात गोडवा होता.जीवनात एक विलक्षण आनंद होता.आज आपण एका वेगळ्या टप्प्यावर येऊन थांबलो आहोत.एका वेगळ्याच दुनियेत जगत आहोत. आमचा बालपणीचा काळ आणि आजचा प्रचंड वेगवान काळ यांत जमीन अस्मानाचा फरक आहे.माणसं स्वार्थाने बिथरली आहेत,बेभान झाली आहेत आणि माणसांची नितीमत्ता घसरली आहे.

आजच्या काळात मानवी मन फार संकुचित झाले आहे.मानवी मनाचा मोठेपणा क्वचित पाहायला मिळत आहे.कितीही संपत्ती कमावली तरी माणूस थांबायला तयार नाही.पैशाच्या मोहात माणूस जीवन जगणं विसरला आहे.पैसा आहे तर सगळं काही आहे या भावनेने तो जीवन जगत आहे. नातीगोती गौण झाली आहेत. कामापुरता मामा आणि ताकापुरती आजी,इथपर्यंतच नाती सांभाळली जात आहेत.काम झाले,स्वार्थ पार साधला गेला की मग सुरू होते मानसिकता तू केवढ्याचा आणि मी केवढ्याचा.आजकाल मनाच्या भावनांना व नात्यांना कोणीच भाव देत नाही.सुखदुःखात मदतीला धावणारे सहसा दिसत नाहीत. गावपातळीवरील निवडणुकीत आणि संपत्ती वाटणीत भाऊ भावाचा वैरी हे वास्तव आता ठरलेले आहे!

सध्या सोशल मीडियावर दोन व्हिडिओ व्हायरल झाले आहेत.एक व्हिडिओ आहे की धुलीवंदनाच्या दिवशी लहान मुलाने अंगावर रंग टाकला म्हणून एका प्रौढ स्त्रीने रागाच्या भरात त्या लहान मुलांवर गरम पाणी ओतले.

आणि दुसऱ्या व्हिडिओत पहायला मिळते की धुलिवंदनाची धूळ खेळताना दोन तीन तरूण एका तरुण मुलीसोबत अश्लील व बीभत्स चाळे करताना दिसतात. यालाच म्हणायचे माणसं बिथरली, नितीमत्ता घसरली आणि माणसं रानटी जनावरे झाली.

बिथरलेली माणसे मनात आले तसे वागत आहेत,घाण घाण बोलत आहेत आणि वाईट कृत्ये करत आहेत.काही व्यक्ती तर पदोपदी माणुसकीला पायदळी तुडवीत आहेत.मनात वासनांचे ढग गोळा करून लोक बेफाम स्वैरपणे वागत आहेत.रोजच्या वर्तमानपत्रांत वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या अतिशय वाईट बातम्या वाचल्या की मनाला खूप वेदना होतात.ही विघातक वृत्ती कुठेतरी थांबायला हवी.त्यासाठी किमान चांगल्या व नितीवान माणसांनी पुढे येऊन माणुसकीला जपण्याचे व आदर्श निर्माण करण्याचे कार्य करायला हवे.नाशिक येथील विचारवंत, सुप्रसिद्ध किर्तनकार व लेखक रमेश वाघ,पंढरपूरचे जेष्ठ नागरिक व विचारवंत संतोष चौंदवार आणि मालेगावचे जेष्ठ व्यक्ती प्रभाकर वारुळे हे तिघेही माझे लेख वाचून फोन करतात. आजच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करतात.त्यांचे कटू अनुभव सांगतात आणि विविध ज्वलंत विषयांवर लेखन करायला सांगतात.अशा नितीवान माणसांची समाजाला फार गरज आहे.

- बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर मो.९७३०९३९७३२

# कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाअंतर्गत सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर येथे कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षणाची तुकडी क्र. ५ चे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा परिषद, सोलापूर मा डॉ. अनिल तांबे, यांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले असून कार्यक्रमाची यशोगाथा सघन कुक्कुट विकास गटाचे प्रमुख डॉ स्नेहंका बोधनकर, पशुधन विकास अधिकारी यांनी विषद केलेली असून सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस पी. माने सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांनी केले आहे.

सदर प्रशिक्षणार्थ्यांना संबोधित करताना डॉ. अनिल तांबे, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर येथील प्रक्षेत्र हे १६ एकरामध्ये बसलेले असून सदर प्रक्षेत्रावर एकूण ४ पक्षीगृह आहेत तसेच अंडी उबवणूक केंद्र हे देखील स्वछ ठेवलेले असून सदर प्रक्षेत्रावरील अवैद्य / गैरकृतीस प्रतिबंध तसेच मालमत्तेचे व वृक्ष संरक्षणासारखे काम एक महिला अधिकारी असताना डॉ. स्नेहंका बोधनकर, पशुधन विकास अधिकारी, सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर यांनी सक्षमपणे कर्तव्य पार पाडत असल्याचे सांगितले. तसेच डॉ. बोधनकर यांनी यापूर्वी घेतलेल्या प्रशिक्षणाच्या तुकड्यांमधून अनेक प्रशिक्षणार्थी स्वतः लघुउद्योजक यशस्वीरीत्या तयार झालेले असल्याचे यावेळी डॉ. तांबे यांनी सांगितलेले आहे.

तसेच सदरील तुकडीतील प्रशिक्षणार्थ्यांमधून श्रीमती वर्षा चक्रनारायण यांनी आपल्या मनोगतातून सदर प्रशिक्षण घेतल्याबाबत परसातील कुक्कुटपालनापासून ते व्यावसायिक कुक्कुटपालनापर्यंतचे ज्ञान हे डॉ स्नेहंका बोधनकर यांच्याकडून मिळाल्याचे तसेच सदर कुक्कुट प्रशिक्षण केंद्र हे सुंदर ठेवलेले असून दैनंदिन प्रशिक्षण वर्गामध्ये देखील सखोल मार्गदर्शन करून आमच्या शंकाचे निरसन हसत खेळत केलेले असल्याने याबद्दल आम्ही सर्वजण समाधानी आहोत असे व्यक्त केले.

डॉ. स्नेहंका बोधनकर यांनी यावेळी शेतकयानी /सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींनी येथील प्रशिक्षणातील ज्ञानाचा उपयोग करून कुक्कुटपालन हा व्यवसाय जोडव्यवसाय म्हणून करण्याऐवजी शास्त्रोक्त पद्धतीने त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन कुक्कुटपालन हा व्यवसाय स्वतंत्रपणे करण्याचा विचार करावा. तसेच कुक्कुटपालन व्यवसायातून भरपूर प्रमाणात अंडी उत्पादन करून सोलापूर जिल्ह्यातील पशुपालकांनी रौप्य क्रांती घडवून स्वतः आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे अशी अपेक्षा डॉ. बोधनकर यानी व्यक्त केली. तसेच जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकानुसार या व्यवसायातून प्राणीजन्य पदार्थ अंडी व मांस हे कमी प्रमाणात उत्पादित होत असल्याने या प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष कृतीत आणून सदरील तुट भविष्यात भरून काढण्यासाठी चांगला वाव असल्याचे सांगितले. तसेच सोलापूर जिल्ह्यातील पोल्ट्रीधारकांनी आपल्या कुक्कुट फार्मची नोंदणी जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सोलापूर या कार्यालयाकडे करण्याचे आवाहन करण्यात आले.

तसेच २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष असल्याचे संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केलेले असल्याचे डॉ. स्नेहंका बोधनकर यांनी संबोधून प्रशिक्षणामध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदवलेल्या महिला प्रशिक्षणार्थिनी भविष्यात कुक्कुटपालन व्यवसाय करून आत्मनिर्भर बनण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच महाराष्ट्र शासनाने पशुसंवर्धन योजनेस कृषी समकक्ष दर्जा प्राप्त झाल्याचा ऐतिहासिक निर्णय कुक्कुटधारकांसाठी फायद्याचा असून यामध्ये २५,००० मांसल पक्षी व ५०,००० अंडी उत्पादक पक्षी आणि ४५,००० क्षमतेच्या हचर युनिटचा कुक्कुटपालन व्यवसायात समावेश असून अशा कुक्कुटपालन धारकांना बीज दर आकारणी, ग्राम पंचायत कर आकारणी हे कृषी वर्गवारीप्रमाणे होणार आहे. तसेच पशुपालन व्यवसाय कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यात येणार आहे. तसेच कृपीप्रमाणेच सोलार पंप व संच उभारण्यास सवलत देण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढणार आहे. असे डॉ. लेहंका बोधनकर यानी संबोधलेले आहे. सदर प्रशिक्षणाची तुकडी दि. ०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ या कालावधीत संपन्न झालेली असून सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. जमादार व श्री. देशमुख, परिचर यांनी परिश्रम घेतलेले आहेत. तरी पुढील तुकडीस जिल्ह्यातील पशुपालकानी तसेच सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी नोंदणी करून लाभ घ्यावा असे आवाहन, पशुधन विकास अधिकारी, सोलापूर डॉ. स्नेहंका बोधनकर यांनी केले आहे.

# आज सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार सन २०२६ मधील पहिले राष्ट्रीय लोकअदालत दिनांक १४ मार्च रोजी सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आली आहे.

'सामंजस्य आणि तडजोडीने जीवन सुखी बनवूया, चला आपण लोकन्यायालयाच्या मार्गाने जाऊया' या घोषवाक्याखाली लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले असून विविध प्रकारची प्रकरणे या लोकन्यायालयात ठेवण्यात येणार आहेत.

**कोणती प्रकरणे ठेवली जाणार?**

- फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे
- बॅक वसुली प्रकरणे
- कलम १३८ एन. आय. ॲक्ट अंतर्गत प्रकरणे
- अपघात न्यायाधिकरण प्रकरणे
- कामगार वाद प्रकरणे
- वीज व पाणी देयक प्रकरणे
- वैवाहिक वाद प्रकरणे
- भुसंपादन प्रकरणे
- बॅक, सहकारी बॅक व पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त

ज्या पक्षकारांना प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नाही त्यांच्यासाठी ऑनलाइन माध्यमाचा वापर करून आभासी पद्धतीने सहभागी होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**धनादेश प्रकरणांमध्ये सवलत**

धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रकरणांमध्ये काही रक्कम भरून प्रकरण निकाली काढणे शक्य होणार आहे. एकरकमी रक्कम देणे शक्य नसल्यास हप्त्यांमध्ये देयकाची तडजोड करून हुकुमनामा करण्यात येईल. परिणामी पक्षकारांना न्यायालयात पुन्हा हजर राहण्याची आवश्यकता राहणार नाही.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे अध्यक्ष मा. श्री. मनोज शर्मा यांनी आवाहन केले आहे की, जास्तीत जास्त पक्षकारांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवून लोक अदालतीचा लाभ घ्यावा.

**लोकन्यायालयाचे फायदे-**

1. प्रकरणाचा झटपट निकाल लागतो.
2. लोकन्यायालयाच्या निवाडयाविरुद्ध अपील नसते.
3. निवाडा समझोतीने होत असल्याने ना जय ना पराजय.
4. दोन्ही पक्षांना समाधानकारक निकाल.
5. द्वेष व कटुता वाढत नाही.
6. न्यायालयाच्या हुकुमनाम्याप्रमाणेच अंमलबजावणी करता येते.
7. वेळ व पैसा दोन्हीची बचत.
8. कोर्ट फी परत मिळते.

# जकराया मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, वटवटे यांना क्रड मानांकन



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील वटवटे येथील जकराया मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या सहकारी वित्त संस्थेला नुकतेच क्रड मानांकन प्राप्त झाले असून ही संस्था व परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन, पारदर्शक कारभार, ग्राहकाभिमुख सेवा आणि आधुनिक बँकिंग प्रणालीचा प्रभावी अवलंब यामुळे संस्थेला हे मानांकन मिळाले आहे.

दि. १२ जानेवारी २०१२ रोजी स्थापन झालेल्या या संस्थेने अल्पावधीतच उल्लेखनीय प्रगती साधली आहे. संस्थेचे चेअरमन मा. सचिन बिराप्पा जाधव यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे संस्था सातत्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. संस्थेच्या संचालक मंडळामध्ये नागनाथ तुकाराम जाधव व भानुदास नामदेव गावडे हे संचालक म्हणून कार्यरत आहेत. संस्थेच्या प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी सीईओ सौ. मनीषा सचिन जाधव यांच्याकडे असून जनरल मॅनेजर श्री. बाळासाहेब औदुंबर जाधव हे संस्थेच्या दैनंदिन कामकाजाचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करत आहेत. सध्या संस्थेच्या एकूण ठेवी सुमारे ३३० कोटी रुपये असून संस्थेच्या ११ शाखा विविध ठिकाणी कार्यरत आहेत. संस्थेमध्ये ५० कर्मचारी कार्यरत असून ते ग्राहकांना विश्वासार्ह व गुणवत्तापूर्ण सेवा देत आहेत.

ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, लघुउद्योगिक व व्यावसायिक घटकांना आर्थिक मदत, कर्ज सुविधा तसेच बचत योजनांद्वारे सक्षम करण्याचे कार्य संस्था सातत्याने करत आहे. संस्थेच्या पारदर्शक व शिस्तबद्ध कामकाजामुळे ग्राहकांचा विश्वास दिवसेंदिवस वाढत आहे.

संस्थेला प्राप्त झालेले क्रड मानांकन हे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण सेवा, सक्षम व्यवस्थापन व उच्च दर्जाच्या कामकाजाची दखल असल्याचे मानले जात आहे. या मानांकनामुळे संस्थेची विश्वासार्हता अधिक दृढ होऊन भविष्यात संस्थेच्या प्रगतीला अधिक चालना मिळणार आहे.

याबाबत बोलताना चेअरमन मा. सचिन बिराप्पा जाधव यांनी सांगितले की, 'सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे मार्गदर्शन आणि कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक परिश्रमामुळे संस्थेला हे यश मिळाले आहे. पुढील काळात संस्थेच्या सेवा अधिक आधुनिक, सक्षम व ग्राहकाभिमुख करण्याचा आमचा प्रयत्न राहील.'

या यशाबद्दल परिसरातील नागरिक, सभासद तसेच विविध मान्यवरांकडून संस्थेचे चेअरमन, संचालक मंडळ आणि सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला स्वायत्तता देण्यासाठी समिती स्थापन

**मुंबई:** मुंबईतील ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज. जी. समूह रुग्णालय तसेच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थांना स्वायत्तता देण्यासंदर्भात सविस्तर धोरणात्मक आराखडा तयार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदेर्शानुसार उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी राज्याचे माजी मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने शासन निर्णय जारी केला आहे.

स्वायत्ततेच्या माध्यमातून राज्यातील प्रमुख शासकीय वैद्यकीय संस्थांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन क्षमता आणि आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्याचा शासनाचा उद्देश असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

समितीत टाटा मेमोरिअल रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. राजेंद्र बडवे, के.ई.एम. रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. संजय ओक, ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रणजीत माणकेश्वर, बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथील प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे प्रबंधक हे समितीचे सदस्य सचिव असतील.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची सध्याची प्रशासकीय व शैक्षणिक संरचना, स्वायत्त दर्जा देण्याची आवश्यकता,संभाव्य लाभ, तसेच देश-विदेशातील यशस्वी मॉडेल्सचा अभ्यास समिती करणार आहे. यामध्ये एम्स, पीजीआय चंदीगड आणि टाटा मेमोरिअलसारख्या संस्थांच्या व्यवस्थापन पद्धतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

स्वायत्त महाविद्यालयांसाठी संचालक मंडळ आणि शैक्षणिक परिषद यांची रचना, व अधिकार. संचालक/अधिष्ठाता यांचे अधिकार व जबाबदाऱ्या. स्वायत्त व्यवस्थेसाठी आवश्यक आर्थिक व प्रशासकीय यंत्रणेबाबत शिफारस करणे. आर्थिक स्वातंत्र्य, अंतर्गत महसूल निर्मिती, लेखापरीक्षण व्यवस्था, तसेच कर्मचारी व अध्यापकांसाठी नवीन सेवा अटी आणि धोरणे याबाबत समिती शिफारसी करणार आहे. आवश्यक कायदेशीर, प्रशासकीय व धोरणात्मक बदलांबाबतही समिती शासनाला मार्गदर्शन करणार आहे.

शासकीय शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देताना त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता प्रशासकीय व आर्थिक बाबींमध्ये अधिकारांचे हस्तांतरण सुचवणे. स्वायत्त संस्थेच्या कार्यक्षमतेसाठी देखरेख, मूल्यमापन व उत्तरदायित्व यंत्रणेबाबत शिफारस करणे. धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्याकरिता आराखडा तयार करणे आदि कामे समिती करणार आहे.

समितीने सविस्तर अहवाल तीन महिन्यांच्या आत शासनाला सादर करायचा आहे. समितीला आवश्यक ती माहिती आणि तांत्रिक सहाय्य वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत (डीएमईआर) उपलब्ध करून देण्यात येणार असून सदस्यांना शासन नियमानुसार मानधन, प्रवास खर्च व इतर भत्ते देण्यात येणार आहेत.

## वात्रटिका

**आता तडजोडच हाती**

जुने सोडून जमणार नाही
याची सगळ्यांनी दिली कबुली...
पुन्हा एकदा म्हणा सगळेच
घरोघरी मातीच्या चुली...
मागचेच दिवस पुढे येतात
अशा घडामोडी घडतात...
गरज पडते तेव्हा माणसे
बरोबर तडजोड करतात...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोलापूर महानगरपालिका महिला महोत्सव २०२६ उत्साह पूर्ण वातावरणात समारोप



या वेळी विश्वविजेत्या भारतीय अंध महिला क्रिकेट संघाच्या उपकर्णधार कु.गंगा कदम यांना महानगरपालिकेच्या वतीने मा. उपमहापौर यांच्या हस्ते सन्मानपत्र व 50,000 रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुले यांनी केले तर आभार प्रदर्शन सहाय्यक आयुक्त मनिषा मगर यांनी केले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगर पालिका, महिला बालकल्याण विभाग व दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान आयोजित महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाल बाजारपेठ मिळावी, त्याचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने दिनांक ९ ते ११ मार्च २०२६ रोजी महिला बचत गट उत्पादित वस्तु व खाद्यपदार्थ विक्री प्रदर्शन सोलापूर महानगरपालिका आवार, इंद्र भवन परिसर, पार्क चौक, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले होते, त्याचा लाभ सोलापूर शहरातील नागरिकांनी घेतला.

सोलापूर शहरातील महानगरपालिकेच्या सहकार्याने महिलांनी उद्योग व्यवसायाची उभारणी केली आहे, अशा बचत गटांनी केलेल्या हातानी बनवलेले व आरोग्यदायी ताजे, स्वच्छ व चविष्ट खाद्य पदार्थ, विणकाम, लाकडी कोरीव काम, कापडी शिवणकाम केलेल्या वस्तु, सुगंधी वस्तु अगरबत्ती, विविध प्रकारचे मसाले, चटणी व पापड, ड्रेस मटेरियल, साडी, कडक भाकरी, शेंगा चटणी, शेंगा पोळी, जवस, कारळ, शेंगा, शेंगा पोळी, धपाटे, सर्व प्रकारचे पापड विक्री, मसाले, तिखट मसाले, खाद्यपदार्थ, हर्बल तेल, झाडू, खराटा, मूर्ती विक्री, कॉस्मेटिक, वडा पाव, पाणी पुरी, चायनीज पदार्थ, फ्रुट धपाटे कॉकटेल पेय, मसाले उन्हाळी काम , बिस्कीट, अगरबत्ती, धूप, ज्यूस, गुळ पावडर पुरण प्रीमिक्स नाचणी ज्वारी बिस्कीट हेल्थ ड्रिंक पावडर, यासह अनेक वस्तु चे 42 स्टाल प्रदर्शनात लावण्यात आले होते, या तीन दिवसात प्रदर्शनात सात लाखापेक्षा जास्त रूपयांची साहित्य, वस्तु ची विक्री झाली. सोलापूर शहरातील महिलांना आपले कलागुण सादर करता यावे या करिता विविध सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन हि करण्यात आलेले होते. यामध्ये १६ वर्षापुढील सर्व मुली व महिला करिता स्पर्धा हि खुली ठेवण्यात आली होती या स्पर्धेत महिला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता या वेळी विविध स्पर्धांची प्राथमिक फेरी घेऊन मुख्य स्पर्धा घेण्यात आली होती या अंतर्गत विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. सदर स्पर्धे साठी ३ दिवस वेगवेगळे परीक्षक उपस्थित होते यामध्ये सैफन इनामदार ,नेहा रार्चला , स्नेहल जोशी –कुलकर्णी, आलिया इम्रान, भूमिषा शहा, आसावरी गांधी, निखील भालेराव, रुपाली गायकवाड आदींनी केले. कार्यक्रम करिता भेट वस्तू प्रायोजक चाटला चादर सेंटर सौ. मासाई गोवर्धन चाटला व वेशभूषा स्पर्धेचे नियोजन करिता हीना बुटिक चे सैफन इनामदार यांचे सहकार्य लाभले. महापौर विनायक कोंड्याल, आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्या मार्गदर्शनानुसार ३ दिवस पार पडलेल्या महिला महोत्सव अंतर्गत सर्व स्पर्धेचे बक्षीस वितरण हे उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, गट नेत्या वहीदा बनो शेख, भाजप शहर अध्यक्ष रोहिणीताई तडवळकर, तसेच पुढील नवनिर्वाचित नगरसेविका सोनाली गायकवाड, कु.मृण्मयी गवळी, वंदनाताई गायकवाड, सुधा अल्लीमोर, साधना संगवे, सारिका खजूरगी, श्वेता खरात, श्रद्धा पवार व उपस्थित मान्यवर नगरसेविकांच्या शुभहस्ते देण्यात आले.

# जिजाऊ स्मारकासाठी संभाजी ब्रिगेडचे निदर्शन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूर शहरातील चार हुतात्मा पुतळ्याच्या शेजारी राष्ट्रमाता जिजाऊ यांचे स्मृतिस्थळ किंवा स्मारक व्हावे म्हणून संभाजी ब्रिगेडच्या वतीने निदर्शन करण्यात आले यावेळी राष्ट्रमाता जिजाऊंचा विजय असो सोलापूर शहरांमध्ये राष्ट्रमाता जिजाऊंचे स्मारक किंवा स्मृतिस्थ झालेच पाहिजे जय जिजाऊ जय शिवराय तुमचं आमचं नातं काय जय जिजाऊ जय शिवराय या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला

सोलापूर शहरांमध्ये कुठेही राष्ट्रमाता जिजाऊंचे पुतळा किंवा स्मारक नाही त्यामुळे विविध कार्यक्रम प्रसंगी अभिवादन करताना शिवभक्तांना मोठी अडचण येत आहे

याबाबत सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील सध्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आमदार देवेंद्र कोठे तसेच सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन देऊन सुद्धा प्रशासनाच्या वतीने दखल घेण्यात आली नाही त्यामुळे संभाजी ब्रिगेडच्या वतीने चार हुतात्मा चौकामध्ये प्रशासनाच्या विरोधात निदर्शने करण्यात आली.

भाजपचे पालकमंत्री आमदार जाणून बुजून मराठा समाजाच्या विविध मागण्यांकडे दुर्लक्ष करीत आहेत असा आरोप सुद्धा संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे श्याम कदम संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले सतीश शिरसाट मंगल सिंह ठाकुर रमण शिवशेट्टी संभाजी ब्रिगेड जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विक्रम वानकर जिल्हा संघटक दिलीप भोसले उद्योग आघाडी शहराध्यक्ष संतोष सुरवसे जिल्हा उपाध्यक्ष सिताराम बाबर जिल्हा सचिव राजेंद्र माने जिल्हा सचिव प्रशांत देशमुख आदी उपस्थित होते.

# सिंहगडमध्ये बाल विवाह विरोधी सामूहिक शपथ घेऊन महिला दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात केगाव येथे सिंहगड–हिरकणी सेलच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'महिला सशक्तीकरण आणि सुरक्षा जनजागृती' या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळेस बालविवाह प्रतिबंध करण्यासाठी सामूहिक बालविवाह विरोधी शपथ घेण्यात आली. कार्यक्रमासाठी राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभाग संचलित सखी वन स्टॉप सेंटरच्या प्रशासक सुवर्णा शिवानंद गाडेकर, केस वर्कर शुभांगी दत्ता कांबळे तसेच सुरक्षा रक्षक सोनाली ताटे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. हा कार्यक्रम कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता. यावेळेस बालविवाहाचे दुष्परिणाम आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे नुकसान यावर समुपदेशन झाले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. मयुरी लटके यांनी काम पाहिले.

यावेळी प्रमुख अतिथींनी महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता, कायदेशीर हक्क आणि संकटसमयी उपलब्ध असणाऱ्या शासकीय मदत यंत्रणांबाबत विद्यार्थिनींना सविस्तर मार्गदर्शन केले. समाजात महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन शिक्षण, करिअर आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळेस प्राचार्य डॉ शंकर नवले, प्रा. सुवर्णा क्षीरसागर उपस्थित होत्या. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये सुरक्षितता व स्वसंरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

**हेल्पलाइन चा केला प्रसार**

राज्य शासनाच्या सखी वन स्टॉप सेंटरच्यावतीने वूमन हेल्पलाइन 181 तर बाल अत्याचार विरोधी चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक 1098 यांचा प्रचार, प्रसार केला. यात गोपनीयता राखली जात असल्याचे सांगितले. कोणतीही अडचण आल्यास जवळच्या सखी वन स्टॉप सेंटरशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

# चैत्री यात्रा कालावधीत गॅस पुरवठा सुरळीत राहील याबाबत प्राधान्याने दक्षता घ्यावी -प्रांताधिकारी इथापे



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** चैत्री शुध्द एकादशी 29 मार्च रोजी असून, या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. यात्रेत शहरात व परिसरात विविध ठिकाणी खाद्यपदार्थ विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थाची दुकाने उभारण्यात येतात. या कालावधीत गॅसचा काळाबाजार, साठेबाजी रोखण्यासाठी विशेष पथकामार्फत तपासणी करून घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत राहील याबाबतची प्राधान्याने दक्षता घ्यावी ,अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

चैत्री यात्रा नियोजनाबाबत प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली यावेळी तहसिलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, पोलीस निरिक्षक दशरथ वाघमोडे, मंदीर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संभाजी भोसले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे श्री. घोडके तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, सध्या उन्हाळा सुरु असून, दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. यात्रेसाठी येणा–या भाविकांना उष्णतेचा त्रास होवू नये यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात तसेच औषधोपचारासाठी आवश्यक असलेली सर्व सामुग्री उपलब्ध ठेवावी. मंदिर समितीने दर्शन रांग व पत्रा शेडमध्ये पंखे, कुलर्स मॅट, स्वच्छ व मुबलक पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. भाविकांना तात्काळ व सुलभ दर्शन व्यवस्थेबाबत नियोजन करावे. यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना तसेच स्थानिक नागरिकांसाठी मुबलक व स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा यासाठी नगरपालिकेने नियोजन करावे. आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याची टँकरची संख्या वाढवावी. शहरातीलिअतिक्रमणे व बेकायदेशीर होर्डींग तात्काळ काढावेत.

चैत्री यात्रा उन्हाळ्याच्या दिवसात असल्याने अन्न पदार्थ लवकर खराब होण्याची शक्यता आहे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनाने हॉटेल, उपवासाचे पदार्थ विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करण्यासाठी पथके नेमून मोहीम राबवावी. आरोग्य विभागाने वारी कालावधीत वैद्यकीय पथके कार्यरत ठेवावी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करावी पुरेसा औषधसाठा उपलब्ध करुन ठेवावा. वीज वितरण कंपनीने सुरक्षित व अखंडीत वीज पुरवठा सुरु ठेवावा. एस.टी. महामंडळाने प्रवाश्यांसाठी बस स्थानकात 24 तास पिण्याचे पाणी उपलब्ध राहिल याची व्यवस्था करावी. अशा सूचनाही प्रांताधिकारी श्री. इथापे यांनी दिल्या.

यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे यासाठी बोअरवेल, हातपंपाची पाणी तपासणी करण्यात येत आहे. जादा हंगामी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. 65 एकरमध्ये भाविकांच्या सुविधेसाठी पाणी, वीज, स्वच्छता आदी सुविधा उपलब्ध येणार असल्याचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

चैत्री यात्रा कालावधीत पत्राशेड, दर्शन रांग, दर्शन मंडप, मंदीर मंदीर परिसर येथील स्वचछता मंदीर समितीच्या वतीने करण्यात आहे. यासाठी स्वयंसेवक व मंदीर समितीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात येत असल्याचे मंदीर समितीचे व्यवस्थापक श्री भोसले यांनी सांगितले.

यावेळी प्रांतधिकारी इथापे यांनी सार्वजनिक बांधकाम, तहसिल, पोलीस प्रशासन, पाटबंधारे, एस.टी, पुरवठा विभाग आदी विभागांचा आढावा घेवून संबंधितांना आवश्यक सूचना दिल्या.

# सामाजिक उत्तरदायित्व म्हणून शिवप्रसाद फाउंडेशनचे मोलाचे कार्य- शरद मोरे



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** शेतकरी हितासाठी शिवप्रसाद उद्योग समूह कटिबद्ध आहे. शिवप्रसाद मल्टीस्टेट सहकारी दूध संघाच्या माध्यमातून सभासदांच्या दुधाला इतर संघांच्या तुलनेत प्रति लिटर ५ रुपये अधिक दर दिला जात आहे.केवळ दरच नव्हे, तर दुधाची गुणवत्ता आणि जनावरांचे आरोग्य जपण्यासाठी 'शिवप्रसाद कॅटल फीड' मार्फत उत्कृष्ट दजार्चे पशुखाद्य पुरवले जाते. पशुपालकाचे उत्पन्न वाढवणे हा उद्देश डोळयासमोर ठेवून सामाजिक उत्तरदायित्व म्हणून शिवप्रसाद फाउंडेशनचे मोलाचे कार्य असल्याचे मत शिवप्रसाद फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शरद बापू मोरे यांनी आपले मत व्यक्त केले ते शिवप्रसाद मल्टीस्टेट दूध संघ, एस.पी.जी. इन्शुरन्स, शिवप्रसाद कॅटल फीड्स, नमो इटेबल ऑइल, श्री शरद बापू मोरे मोटार वाहतूक सहकारी संस्था व शिवप्रसाद उद्योग समूहाच्या वतीने गुरसाळे तालुका माळशिरस येथे घेण्यात आलेल्या जनहित जागर मेळावा प्रसंगी बोलत होते. पुढे बोलत असताना ते म्हणाले की, दुग्ध व्यवसायातील अडचणी सोडवण्यासाठी आणि हा व्यवसाय वाढवण्यासाठी उद्योग समूहाने विविध सेवांचे जाळे विणले असून शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. शेतकरी सक्षम झाला तरच देश प्रगती करेल या उद्देशाने माळशिरस तालुक्यातील प्रत्येक गावात आम्ही 'जनहित जागर मेळावा' आयोजित करून शेतकऱ्यांच्या दारात सेवा पोहोचवत आहोत दुग्ध व्यवसायासाठी 'शिवप्रसाद अर्बन' आणि 'एस.पी.जी. मल्टीस्टेट'तर्फे सुलभ कर्जपुरवठा देखील केला जात.असल्याचे शरद मोरे यांनी सांगितले. याप्रसंगी मेळाव्याला गुरसाळे परिसरातील सेंटर चालक, शेतकरी, दूध उत्पादक आणि शिवप्रसाद समूहाचे पदाधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जीसीसी-टीबीसी परीक्षेत कोमल गोसावीचे यश

**अकलूज (कटूसत्य वृत्त)** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे वतीने जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय जीसीसी–टीबीसी परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेमध्ये भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट अकलूज या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश प्राप्त केले. या संस्थेतील कोमल प्रभाकर गोसावी हिने इंग्रजी ३० शब्द प्रति मिनिट स्पिड या विषयात ९९% गुण प्राप्त करत सोलापूर जिल्ह्यामध्ये द्वितीय क्रमांकाचा तर माळशिरस तालुक्यामध्ये प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे तर मल्हार नितीन कुदळे याने इंग्रजी ३० स्पीड मध्ये ९८% गुण प्राप्त करत तालुक्यात द्वितीय तर निर्जरा रमेश माने हिने याच विषयात ९७% गुण प्राप्त करत तृतीय क्रमांकाचा बहुमान प्राप्त केला. विशेष बाब म्हणजे संपूर्णतः अंध विद्यार्थी जिब्रान जावेद तांबोळी याने इंग्रजी ३० स्पीड विषयात ९५% व इंग्रजी ४० स्पिड विषयात ८६% गुण प्राप्त करत विशेष उल्लेखनीय यश प्राप्त केले. परीक्षेमध्ये त्यास वाचनकर्ता म्हणून प्रतीक होनमाने याचे विशेष सहकार्य लाभले.भक्ती संस्थेच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम ठेवत घवघवीत यश संपादन केले आहे.

**विषयानुसार संस्थेतील प्रथम तीन क्रमांक मिळवलेले विद्यार्थी:**

इंग्रजीत ३० श.प्र.मि. स्पीड या विषयात – गोसावी कोमल प्रभाकर ९९% प्रथम,मल्हार नितीन कुदळे ९८% द्वितीय,निर्जरा रमेश माने ९७% तृतीय.मराठी ३० श.प्र.मि. या विषयात :– सौरभ लक्ष्मण कोळेकर ९६% प्रथम,श्रद्धा उमेश गवसणे ९४.५% द्वितीय,रणजीत रघुनाथ चव्हाण ९४% तृतीय.इंग्रजी ४० श.प्र.मि. या विषयात:– निर्जरा रमेश माने ९३.५% प्रथम,सुशांत हरिदास वगैरे ९२.५% द्वितीय, ज्ञानेश किशोर कटके ९२% तृतीय.

हिंदी ३० श.प्र.मि.या विषयात ज्ञानेश किशोर कटके याने ९५% गुण प्राप्त करत विशेष यश संपादन केले.या परीक्षातील स्पीड विभागामध्ये आरती नलवडे, कोमल गोसावी, मल्हार कुदळे, स्नेहल चमरे,तेजश्री गमे,विठ्ठल देवकते यांनी ४० पैकी ४० गुण प्राप्त करत विशेष प्राविण्य मिळविले तर पत्रलेखन, तक्ता व ईमेल लेखन या विभागामध्ये ज्ञानेश कटके, प्रियंका होनमाने, विशाल खंडागळे, जिब्रान तांबोळी, अंकिता कदम, सौरभ कोळेकर, मल्हार कुदळे, प्रसाद शिंदे यांनी ३५ पैकी ३५ गुण प्राप्त करत विशेष प्राविण्य मिळविले व वस्तुनिष्ठ प्रश्न विभागामध्ये कोमल गोसावी व हिंदवी थिटे यांनी २५ पैकी २५ गुण प्राप्त करत विशेष प्राविण्य प्राप्त केले.संस्थेतील ७७ विद्यार्थ्यांनी 'ए प्लस' श्रेणी व १९ विद्यार्थ्यांनी 'ए' श्रेणी प्राप्त केलेली आहे.महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे मार्फत विविध शासकीय विभाग, निमशासकीय, महामंडळे, सहकारी संस्था विभाग,न्यायालय आदींमध्ये लिपिक (क्लार्क) पदांच्या भरतीसाठी जीसीसी टीबीसी मराठी व हिंदी ३० व ४० शब्द प्रति मनिट या विषयांचे व इंग्रजी ३०,४०,५० व ६० श.प्र.मि. या विषयांचे कोर्सेस महाराष्ट्र व गोवा राज्यातील शासनमान्यता प्राप्त संस्थांमधून चालविले जात असून परिषदेमार्फत वर्षातून दोनदा या परीक्षा घेतल्या जातात व या परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी लिपिक पदांच्या भरतीसाठी पात्र ठरतात. जानेवारी २०२६ मधील जीसीसी–टीबीसी परीक्षेत दैदीप्यमान यश प्राप्त केलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे प्राचार्य गजानन जवंजाळ, नितीन दुरणे, किरण भगत, ज्ञानदीप जवंजाळ व प्रज्ञा गायकवाड यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.उज्वल यश प्राप्त करत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि विशेषतः अंध विद्यार्थी जावेद तांबोळी याचे सर्व स्तरावरून कौतुक होत असून संस्थेच्या वतीने प्राचार्य गजानन जवंजाळ यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# चपळगावात होम मिनिस्टर कार्यक्रम उत्साहात संपन्न



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून चपळगाव आणि बावरकवाडी येथील महिलांसाठी आयोजित होम मिनिस्टरचा सोहळा अत्यंत उत्साहात झाला.

चपळगाव जिल्हा परिषद गटाच्या सदस्या शांभवी सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. अवंती अभिजित पाटील व अभिजित पाटील मित्रपरिवारातर्फे या सोहळ्याचे आयोजन झाले. या सोहळ्याचा प्रारंभ क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, माता रमाई, ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन आणि स्व. संतोष दादा पाटील यांच्या प्रतिमांचे पूजनाने झाले.

याप्रसंगी शांभवी कल्याणशेट्टी म्हणाल्या की, अशा उपक्रमांमुळे महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो आणि त्यांना एक वेगळा आत्मविश्वास प्राप्त होतो. पाटील परिवाराने आयोजित केलेला हा सोहळा महिला सक्षमीकरणाचे एक उत्तम उदाहरण आहे.

प्रा. रोहित गुरव यांनी आपल्या खुमासदार शैलीत खेळांची मांडणी केली. उखाण्यांची जुगलबंदी आणि विविध कौशल्यावर आधारित खेळांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत सरस्वती तिवारी यांनी प्रथम क्रमांक पटकावत मानाची पैठणी साडी व रेफ्रिजरेटर जिंकले.

तसेच द्वितीय क्रमांकाचा एल. ई.डी. टी.व्ही. साक्षी जाधव, तृतीय क्रमांकाचा कुलर शीतल जाधव यांसह गॅस शेगडी आणि मिक्सर रेश्मा बाणेगाव व सावित्री सागरे यांनी पटकावले.

**CHANGE IN NAME**

My old name was **Munera/ Munna Wayad Tamboli,** but I have changed my name to **Khatunbi Vahid Tamboli.** I should known by my new name From today onwards.

# सांगोला नगरपरिषदेमार्फत होम मिनिस्टर कार्यक्रम उत्साहात



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला नगरपरिषदेच्यावतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ७ व ९ मार्च रोजी विविध स्पर्धा व होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ७ मार्च रोजी पाककला व ग्रुप डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पाककला स्पर्धेकरिता प्रत्येकी ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाकरिता ठेवण्यात आले होते. ग्रुप डान्स स्पर्धेकरिता प्रत्येकी रुपये ७ हजार, ५ हजार व ३ हजार अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाकरिता ठेवण्यात आले होते. त्याप्रमाणे पाककला स्पर्धेमध्ये अफरीन पठाण, मनीषा हुंडेकरी, नीता लाटणे, राजाबाई मस्के व ग्रुप डान्स स्पर्धेमध्ये युवा ग्रुप, सखी ग्रुप, धुरंदर ग्रुप, चौंडेश्वरी ग्रुप हे अनुक्रमे प्रथम द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ बक्षिसाचे मानकरी ठरले.

दि. ९ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली होम मिनिस्टर तसेच बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती भवन सांगोला येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी महिला व बालकल्याण समिती सभापती छायाताई मेटकरी, डॉ. निकिताताई देशमुख, अपेक्षाताई पाटील, पंचायत समिती सदस्या राणीताई पाटील, वंदना शेळके, डॉ. नेहा साळुंखे–पाटील, डॉ. मेघना देवकाते, तालुका कृषी अधिकारी दीपाली जाधव, सुनंदाताई घोंगडे, पूजाताई पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरसेविका राणीताई माने यांनी केले तर निकिताताई देशमुख यांनी, छायाताई मेटकरी यांनी मार्गदर्शन केले. बक्षीस वितरण समारंभात कवयित्री पुष्पाताई मिसाळ, मनीषा ठोंबरे, अर्चना देसाई, सुवर्णा तेली, हर्षदा गुळमिरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच प्रशासनातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सायली पाटील यांचाही सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी नगरपरिषदेचे कर अधिकारी प्रियंका पाटील, अस्मिता निकम व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अथर्व जाधव खुन खटला : बाळु काळेंना उच्च न्यायालयात जामीन मंजुर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अवैध व्यवसायातील पैशाच्या हिशोबाच्या वादातून अथर्व जाधव याचा खून केल्याप्रकरणी अटकेत असलेले बाळु उर्फ औदूंबर प्रकाश काळे, रा. विजापूर रोड, सोलापूर यांच्या जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयच्या कोल्हापूर सर्किट बेंचचे न्यायमुर्ती श्री. सचिन देशमुख यांच्यासमोर होऊन न्यायमुर्तींनी आरोपी बाळु उर्फ औदुंबर काळे ची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणी हकीकत अशी की, अवैध व्यवसायाच्या आर्थिक हिशोबावरुन आरोपी व त्यांचे भागीदार यांच्यामध्ये वाद उपस्थित झालेला होता. सदरचा वादामुळे आरोपी बाळु काळे हे त्यांचे भागीदारांवरती चिडुन होते. दि. ०४/१०/२०२४ रोजी सायं ५ वाजता बाळु काळे व त्यांचे साथीदारांनी कट केला. व वाहनांमधून हत्यार घेऊन इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलचे पाठीमागील मोकळया मैदानातील ऑफिसमध्ये येऊन हिशोबाच्या कागदाची मागणी केली व ऑफिसमधील सर्व साहित्य व हिशोबाच्या नोंद वहया ताब्यात घेऊन साहित्याची तोडफोड केली व ऑफिसमधील कामगारांना मारहाण करण्यास सुरुवात केली व सदर मारहाणीत कामगार अथर्व जाधव यास बांबु ,कुऱ्हाड, कोयता व तलवार अशा शस्त्राने मारहाण करुन त्यास जखमी केले व तो उपचारादरम्यान अश्विनी सहकारी रुग्णालय येथे मरण पावला, असे सरकार पक्षाचे म्हणणे होते.

यातील आरोपी बाळु उर्फ औदूंबर प्रकाश काळे याचा जामीन अर्ज सोलापूर सत्र न्यायालयाने फेटाळून लावला होता. त्यानंतर आरोपी बाळू काळे यांनी कोल्हापूर उच्च न्यायालयात ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाची सुनावणी कोल्हापुर उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती श्री. सचिन देशमुख यांच्यासमोर झाली. जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आरोपीला सदर खटल्यामध्ये खोटेपणाने गुंतवलेले आहे. अथर्व जाधव याचा मृत्यु हा अपघाती आहे तसे प्रथम नोंदीवरून दिसून येते, असा युक्तिवाद केला. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायमुर्तींनी आरोपी बाळु काळे याची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. ए. एस. साळगावर यांनी काम पाहिले.